लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : सोमवार - ९ ऑक्टोबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १८२
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329,
88888 45403, 88888 45404.
Online Booking : www.vishwatravels.in

# महिला कार्यकर्तीच्या बहुचर्चीत खून प्रकरणी महेंद्र चौहान, समीर किल्लारीकरास जन्मठेप

## विक्रमसिंह चौहान, कुलदीप ठाकूर, प्रभाकर शेट्टी, सुवर्णसिंग ठाकूर यांना तीन वर्षाचा कारावास

**लातूर : सुमारे नऊ वर्षापुर्वी राज्यातच नव्हे तर सबंध देशामध्ये गाजलेल्या लातूर येथील युवक काँग्रेसच्या पदाधिकारी कार्यकर्तीच्या खून प्रकरणी महेंद्रसिंह विक्रमसिंह चौहान, समीर किल्लारीकर यास जन्मठेप तर लातूरचे माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चौहान, कुलदीप ठाकूर, प्रभाकर शेट्टी, सुवर्णसिंग ठाकूर या तिघांना तीन वर्षाच्या कारावासाची शिक्षा लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय वर्ग-१ मा. आर. बी. रोटे यांनी सुनावली आहे.**

सुमारे नऊ वर्षांपुर्वी लातूर शहर काँग्रेसच्या महिला युवक पदाधिकारी असलेल्या एका तरूणीचा खून केल्या प्रकरणी लातूरच्या एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. ज्या दिवशी त्या तरूणीचा खून झाला तो दिवस २१ मार्च २०१४ (रंगपंचमी) चा होता. तिचा खून व कट रचल्याप्रकरणी पोलिसांत महेंद्रसिंह विक्रमसिंह चौहान, समीर किल्लारीकर, सुवर्णसिंग श्रीरंग ठाकूर, प्रभाकर जयराम शेट्टी, कुलदीप नागूसिंग ठाकूर, विक्रमसिंह दत्तुसिंह ठाकूर यांच्या विरोधात एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. युवक काँग्रेसच्या महिला पदाधिकारी असलेल्या तरूणीचा खून झाल्याचे प्रकरण त्यावेळी सबंध देशभरात गाजले होते. त्याच दरम्यान लोकसभेच्या निवडणुकाही होत्या. या खून प्रकरणाचा नामोल्लेख देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रपूर येथील एका जाहीर सभेत केला होता. त्याचवेळी पंतप्रधान मोदी यांची लातूरच्या जिल्हा क्रीडा संकुल मैदानावर जाहीर सभा झाली होती. या सभेत देखील त्यांनी या प्रकरणाचा उल्लेख केला होता. माध्यमांमधून हे प्रकरण मोठ्या प्रमाणात चर्चीले गेले. २१ मार्च २०१४ रोजी त्या तरूणीची हत्या झाली व तिचे प्रेत २७ मार्च २०१४ रोजी अपचुंदा (तुळजापूर) येथील एका तलावात आढळून आले होते. त्यानंतर शवविच्छेदन करण्यात आले होते. या प्रकरणी सुरूवातीस एमआयडीसी पोलीस, त्यानंतर स्थानीक गुन्हे अन्वेषण विभाग, त्यानंतर सीआयडी पथकाने तपास केला. त्यानंतर हे प्रकरण तपासासाठी सीबीआयकडे २०१६ मध्ये देण्यात आले. तपासानंतर सीबीआयने या प्रकरणी २०१९ मध्ये पुरवणी आरोपपत्र दाखल केले.

या प्रकरणाचा आज जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्ग १ मा. आर. बी. रोटे यांनी निकाल दिला. जन्मठेप झालेले महेंद्र चौहान हे माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चौहान यांचे पूत्र आहेत. समीर किल्लारीकर हा महेंद्र चौहान यांचा मित्र आहे. सुवर्णसिंग श्रीरंग ठाकूर, प्रभाकर जयराम शेट्टी, कुलदीप नागुसिंग ठाकूर व विक्रमसिंह चौहान यांना कट रचल्याप्रकरणी प्रकरणात दोषी ठरवून त्यांना तीन वर्षाच्या कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

या प्रकरणी सीबीआयच्या वतीने ॲड. शिवाजी चव्हाण यांनी काम पाहिले. या प्रकरणात १२६ साक्षीदार तपासण्यात आले.

लातूर शहर युवक काँग्रेसच्या महिला पदाधिकारी खून प्रकरणानंतर ज्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. ते सर्व आरोपी बरेच महिने कारागृहात होते.

# पाच राज्यांच्या निवडणुकांच्या तारखा निवडणूक आयोगाकडून जाहीर




नवी दिल्ली : देशातील काही राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. त्यामुळे हळूहळू कार्यकाळानुसार राज्यांच्या निवडणूकांच्या तारखा जाहीर करण्यात येतील. निवडणूक आयोगाकडून देखील निवडणुकांच्या संदर्भातील तयारी पूर्ण झाली आहे. त्यामुळे आज निवडणूक आयोगाकडून पाच राज्यांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्यात आलेल्या आहेत. मिझोराम, तेलंगणा, मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगढ या पाच राज्यांच्या निवडणुकांची तारीख आज निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन जाहीर केलेल्या आहेत. निवडणूक आयोगाकडून पाच राज्यांना भेटी देण्यात आल्या होत्या. ज्यानंतर पाचही राज्यांची संपूर्ण माहिती घेऊन निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची संभाव्य ब्ल्यू प्रिंट तयार करून या तारखा जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, मिजोरममध्ये ७ नोव्हेंबरला, छत्तीसगडमध्ये ७ आणि १७ नोव्हेंबरला, मध्यप्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबर आणि तेलंगणामध्ये ३० नोव्हेंबर २०२३ ला मतदान घेण्यात येणाप आहे. तर या पाचही राज्यात ३ डिसेंबरला मतमोजणी करण्यात येणार आहे. त्यामुळे या पाचही राज्याचा निकाल हा एकाच दिवशी लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त अनूप चंद्र पांडेय, अरुण गोयल यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केला.

महत्त्वाची बाब म्हणजे या पाच राज्यांपैकी दोन राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. गेल्या वर्षी राहुल गांधी यांनी 'भारत जोडो' यात्रेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. ते यामध्ये बऱ्यापैकी यशस्वी देखील झाल्याचे पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिंदुत्व, महागाई आणि गॅस सिलेंडरच्या किंमती कमी करून सामान्यांना पुन्हा एकदा स्वतःकडे वळवण्याचा प्रयत्न केला आहे. राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. यांतील राजस्थान राज्यात प्रत्येक पाच वर्षानंतर सरकार बदलत असते. त्यामुळे राजस्थानमध्ये परंपरेनुसार सत्ताबदल होतो की काँग्रेसची सत्ता कायम राहते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे या पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका या सर्वच राजकीय पक्षांसाठी लोकसभेची उपांत्य फेरी असणार आहे.

# जिल्हा बँकेचे संचालक मंडळ जम्मू काश्मीरच्या अभ्यास दौऱ्यावर

लातूर : लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ जम्मू काश्मीरमधील सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यासाठी जम्मू काश्मीर दौऱ्यावर गेले असल्याचे वृत्त आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही नफ्यात चालणारी बँक आहे. बँकेचे संचालक मंडळ ठरावीक वेळी सहकारातील संस्थांचा अभ्यास करण्यासाठी दौरे करते. यावर्षी या संचालक मंडळाने केरळ येथील सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौरा निश्चीत केला होता. त्या दौऱ्यास सहकार विभागाची नाममात्र परवानगी लागते. त्या परवानगीचा प्रस्ताव देखील सहकार विभागाकडे पाठविण्यात आला. मात्र, केरळमध्ये कसलीतरी साथ असल्याने या संचालक मंडळांना केरळचा दौरा रद्द करावा लागला. त्यानंतर दौरा तर करायचा हे निश्चित असल्याने लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मंडळ हे जम्मू काश्मीर येथे दौऱ्यावर गेला आहे. महाराष्ट्र हा सहकारातील आदर्श काम करणारे राज्य आहे. त्याच बरोबर गुजरात, केरळमध्येही अनेक सहकारी संस्थांचा कारभार अभ्यास करावा असाच आहे. मात्र, जम्मू काश्मीरमध्ये चालू असलेल्या सहकारी संस्था व त्या संस्थांचा अनुभव हा निश्चीतच महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला दिशा ठरणारा असावा.

# ...तर लोकसभा निवडणुकीला उशीर होईल-सुप्रिम कोर्ट

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमच्या प्राथमिक तपासणीबाबत दिल्ली काँग्रेसने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या प्राथमिक स्तरावरील तपासणीबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या कारवाईला काँग्रेसने विरोध केला होता. ही प्रक्रिया परिपूर्ण असून, प्रत्येक पक्ष त्यावर विश्र्वास ठेवू शकतो, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. तसेच ही प्रक्रिया पूर्ण देशभरात राबवण्यात आली आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

दिल्ली काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून २०२४ च्या निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएममध्ये काही त्रुटी असल्याचा आरोप केला होता. मात्र या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली प्रदेश काँग्रेसला कुठलाही दिलासा देण्यास नकार दिला. तसेच काँग्रेसच्या या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्यासही नकार दिला.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ही प्रक्रिया खूप विस्तृत आहे. राजकीय पक्षांना ईव्हीएमवर विश्वास आहे. तसेच ही प्रक्रिया संपूर्ण देशात राबवली जात आहे. कोर्टाने सांगितले की, याबाबत काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे जाणं आवश्यक होतं. आम्ही या मुद्द्यावर दखल देणार नाही. कोर्टाने हेही सांगितले की, जर आम्ही यात हस्तक्षेप केला तर निवडणुकांना उशीर होईल. त्यानंतर काँग्रेसने दाखल केलेली याचिका मागे घेतली.

दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष अनिल कुमार यांनी याआधी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल करून केंद्रीय निवडणूक आयोगाला राष्ट्रीय स्तरावरील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची प्राथमिक तपासणी करण्याचे आदेश देण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. त्या सुनावणीनंतर दिल्ली हायकोर्टानेही ही याचिका फेटाळून लावली होती.

# विद्यार्थ्याचे अपहरण



लातूर : उजनी येथील व सध्या लातूर येथे एका हॉस्टेलवर असलेल्या १३ वर्षे वयाच्या विद्यार्थ्याचे लातूरच्या औसा रोडवरील रेमण्ड शोरूम समोरून कोणातरी अज्ञाताने अपहरण केले असून या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहृत मुलाची ओळख पटल्यास संबंधीतांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन तपासीक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक एस. के. पोबुलवार यांनी केले आहे.

संदेश सुभाष ढवण (वय १३ वर्षे १० महिने) रा. उजनी हा सरस्वती कॉलनी परिसरात असलेल्या एका वसतीगृहात राहत होता. तो २६ सप्टेबर २०२३ रोजी गावाकडून लातूर येथे आला. तो औसा रोडवरील रेमण्ड शोरूम समोरील स्टॉपवर दु. १२.३० वाजण्याच्या सुमारास उतरला. पण, तो हॉस्टेलवर पोहचलाच नाही. त्याच्या वडीलाने इतरत्र चौकशी करून देखील त्याचा ठाव ठिकाणा लागला नाही. त्यानंतर संदेशचे कोणातरी अज्ञातांनी अज्ञात कारणासाठी अपहरण केले अशी तक्रार त्याच्या वडीलांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांत भादंवि ३६३ नुसार गुन्हा दाखल केला आहे. त्याची उंची १६० सेमी असून त्याची बोलीभाषा मराठी आहे. त्याच्या अंगात काळ्या रंगाचा पॅन्ट, पोपटी रंगाचा टी-शर्ट, अंगाने सडपातळ, रंग गोरा, सरळ नाक, पायात काळ्या रंगाची सॅन्डल असे वर्णन आहे. या बातमीसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या फोटोनुसार या मुलाची कोणास ओळख पटल्यास त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याशी (फोन :- ०२३८२-२४३१००) संपर्क साधावा असे आवाहन तपासीक अंमलदार यांनी केले आहे.

## त्यांच्या मते....

▣ **सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील प्राथमीक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र प्रायोगीक तत्वावर पाच वर्षासाठी खासगी संस्थांना देण्याचा शासन आदेश जारी**

- एक बातमी

☛ नक्कीच भविष्यात राज्यातील एखादा महसुली विभाग दत्तक देण्याची दुसरी बातमी येऊ शकते.

▣ **छगन भुजबळ यांच्यावरील आरोपांचे काय झाले, सत्तेचा भाग झाल्यानंतर चौकशी थांबत तर नाही ना?**

- अंजली दमानिया

☛ सामान्यांच्या मनात देखील हाच प्रश्न आहे.

▣ **सुप्रियाताई तुम्ही तुमचे बुडते जहाज सांभाळा, जे उरलेत (आमदार) ते सुद्धा आमच्याकडे येतील काळजी घ्या.**

-भाजपाच्या चित्रा वाघ

☛ किती काळजी म्हणायची ही.

▣ **सोलापूरचा खासदार मिसींग असेल तर चला पोलिसांत जाऊ, तक्रार दाखल करू**

- खा. सुप्रियाताई सुळे

☛ कशाला उगीच तक्रार, २०२४ मध्ये सापडतीलच ते.

# शिवसेना-राष्ट्रवादीच्या याचिकांवर एकत्र सुनावणी

मुंबई : शरद पवार गटाने अजित पवार गटाविरोधात दाखल केलेल्या आमदार अपात्रतेच्या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडणार होती. मात्र पवार गटाच्या याचिकेवर स्वतंत्रपणे सुनावणी घेण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला. आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे दिरंगाई करत असल्याचा आरोप ठाकरे गटाचा आहे. त्यानंतर पवार गटाकडूनही तोच आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादीचे प्रकरण सारखंच असल्यानं ठाकरे



गट आणि शरद पवार गटाच्या या मागणीबाबतच्या याचिकेवर आता एकत्र सुनावणी होणार आहे. शुक्रवारी १३ ऑक्टोबरला होणाऱ्या या सुनावणीकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

शिवसेनेच्या आमदार अपात्रतता प्रकरणाची सुनावणी नोव्हेंबर महिन्यात होणार होती. परंतु आज अजित पवार यांच्याबरोबर गेलेल्या ४१ आमदारांवर कारवाई करण्याच्या, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सूचना देण्याची मागणी करणाऱ्या शरद पवारांच्या याचिकेवर १३ ऑक्टोबरला एकत्रित सुनावणी घेण्यात येणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी आमदार अपात्रताप्रकरणाचे वेळापत्रक जाहीर केले आहे.दोन्ही सुनावणी एकत्र घेण्याची सूचना सुप्रीम कोर्ट देण्याची शक्यता आहे.

विधानसभा अध्यक्षांवरील दबाव वाढला आहे. कारण उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गट दोन्ही गटाची एकत्रित याचिका ऐकणार आहेत. दोन्ही प्रकरण सारखी असल्यामुळे सुप्रीम कोर्ट एकच निर्देश देण्याची शक्यता आहे. अध्यक्षांना लवकरात लवकर प्रकरण निकाली काढण्याचे निर्देश सुप्रीम कोर्ट देण्याची शक्यता आहे. जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या तीन महिन्यांत हे प्रकरण चालले. ज्यामध्ये अजित पवार आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात माहिती मागवली. १३ ऑक्टोबरला तारखेला सुनावणी होणार आहे. न्यायाधीश म्हणाले की त्यांनी (अध्यक्षांनी) टाईमटेबल बनवला आहे त्यामुळे १३तारखेला त्यासंबंधी पुढील चर्चा करू. सगळ्यांची बाजू ऐकून निर्णय घेणार आहे. आपला आपल्या न्याय, निवडणूक आणि संविधान तिन्हीवर पूर्ण विश्र्वास असावा जर एखादा निर्णय नियमबाह्य असेल तर सुप्रीमकोर्ट हस्तक्षेप करू शकतं अन्यथा नाही करणार, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले.

# स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाकडून तिघा सराईतांना अटक

लातूर : पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये स्थानीक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकाने तिघा सराईत आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन मोटारसायकली, एक पाणबुडी मोटार, तीन मोबाईल यासह ९७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. परमेश्वर निवृत्ती बोयणे शास्त्री नगर, लातूर, विशाल चंद्रकांत गुळवे रा. इकबाल चौक लातूर, बाबा आजम पठाण शास्त्री नगर लातूर या तिघांना अटक करण्यात आली आहे.




पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अमलदारांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदर पथके चोरीच्या गुन्ह्याच्या माहितीचे संकलन करून तपास करीत असताना दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२३ रोजी संध्याकाळी पाच वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, लातूर शहरातील शास्त्रीनगर परिसरात काही व्यक्ती अगदी कमी पैशात त्यांच्याकडील मोबाईल विक्री करण्याच्या प्रयत्न करीत आहेत. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शास्त्रीनगर येथे पोहोचून कमी किंमतीत मोबाईल विक्री करण्याचा प्रयत्न करीत असलेल्या तीन इसमांना एक मोटार सायकलसह ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली तेव्हा त्यांनी वरील नावे सांगितली.

दरम्यान, पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील मोबाईल बाबत विचारपूस करून माहिती घेतली असता सदरचे मोबाईल नमूद आरोपींनी रात्रीच्या वेळी पाच नंबर ते औसा रोड जाणारे रोडवर पाय जाणाऱ्या इसमांना मारहाण करून जबरीने चोरी केल्याचे सांगितले.

आरोपीकडे आणखी तपास केला असता त्यांनी काही महिन्या पूर्वी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतून एक टीव्हीएस एक्स व पोलीस ठाणे लातूर ग्रामीण हद्दीतून पाण्याच्या पाणबुडी मोटारी चोरल्याचे कबूल केले. पोलीस ठाण्याच्या अभिलेखाची पाहणी केली असता पोलीस ठाणे एमआयडीसी येथे लुना चोरी बाबत एक गुन्हा दाखल असून, लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये पाणबुडी मोटारी चोरी बाबतचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले.

नमुद आरोपींकडून चोरीचे ३ मोबाईल, एक पाणबुडी मोटार, एक टीव्हीएस एक्सएल लुना व गुन्हे करतेवेळी वेळी वापरलेली एक मोटारसायकल असा एकूण किंमत ८७ हजार रुपयाचा मुद्देमाल नमूद आरोपींकडून हस्तगत करण्यात आला असून तीन चोरीचे गुन्हे उघड झाले आहेत. यातील आरोपी सराईत गुन्हेगार असून अनेक पोलीस स्टेशन मधील विविध गुन्ह्यात सहभागी आहेत. पुढील कार्यवाहीस्तव नमूद आरोपींना पोलीस ठाणे लातूर ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. तसेच आणखीन एक कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोबाईल चोरीमध्ये दोन महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी केलेला १० हजार रुपये किंमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून दोन महिलाविरुद्ध पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशन करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सहाय्यक फौजदार संजू भोसले, पोलीस अमलदार रामहरी भोसले, योगेश गायकवाड, सुधीर कोळसूरे, सिद्धेश्वर जाधव, राजेश कंचे, राहुल सोनकांबळे, मनोज खोसे, नितीन कठारे, प्रदीप चोपणे यांनी पार पाडली.

# एनएमसीने मागे घेतला एमबीबीएस उत्तीर्ण गुणांचा आदेश, आता मिळावावे लागणार ५० टक्के गुण

वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी खूशखबर आहे. नॅशनल मेडिकल कौन्सिलने एमबीबीएसचे उत्तीर्ण गुण ४० टक्क्यांनी कमी करण्याची मार्गदर्शक तत्त्वे मागे घेतली आहेत. याबाबत एनएमसीने सांगितले की, एमबीबीएस उत्तीर्ण गुणांमधील कट ऑफ ४० टक्क्यांनी कमी करणे शक्य नाही.




नॅशनल मेडिकल कौन्सिलने सप्टेंबरमध्ये एमबीबीएस उत्तीर्ण गुण वाढवून ४० टक्के केले होते. आता पुन्हा एकदा ते ५० टक्के करण्यात आले आहे. विषयाचा बारकाईने विचार करून हा निर्णय घेतल्याचे एनएमसीने सांगितले.

एनएमसीने १ सप्टेंबर २०२३ रोजी एक आदेश जारी केला होता, ज्यामध्ये MBBS विद्यार्थ्यांना ज्या विषयात दोन पेपर होते त्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण प्राप्त करावे लागतील, असे सांगण्यात आले होते. तुम्हाला सांगतो की, पूर्वीच्या नियमानुसार उत्तीर्णतेचे गुण ५० टक्के होते. अवघ्या महिनाभरानंतर हा आदेश एनएमसीने मागे घेतला आहे. आता एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी केवळ ५० टक्के गुण मिळवावे लागतील.

वैद्यकीय विद्यार्थ्यांना एनएमसीचे जुने नियम पाळावे लागणार आहेत. एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना थिअरी आणि प्रात्यक्षिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ५०% गुण मिळवावे लागतात. तर दोन पेपर असलेल्या कोर्समध्ये, विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी दोन्ही पेपरमध्ये स्वतंत्रपणे ५०% गुण मिळवावे लागतील. अधिक माहितीसाठी, तुम्ही छचउ वेबसाइटवर जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे पाहू शकता.

पुढील वर्षी होणाऱ्या NEET UG परीक्षेचा अभ्यासक्रम नॅशनल मेडिकल कौन्सिलने जाहीर केला आहे. तुम्ही एनएमसीच्या वेबसाइटवर NEET UG 2024 चा नवीन अभ्यासक्रम पाहू शकता. NEET UG परीक्षेची तारीख नॅशनल टेस्टिंग एजन्सीने जाहीर केली आहे. परीक्षेच्या तपशीलांसाठी अधिकृत सूचना पहा.




# कधी झाली इस्त्रायलमध्ये विध्वंस करणाऱ्या हमासची स्थापना?

हमास आणि इस्रायलमधील संघर्ष तीव्र होत चालला आहे. किती दिवस लढणार? त्याचे परिणाम काय होतील? हे आगामी काळच सांगेल. पण स्पर्धा परीक्षांच्या दृष्टिकोनातून इस्रायल आणि हमास हे दोन्ही देश महत्त्वाचे ठरले आहेत. इस्रायल हा देश आहे आणि जगातील अनेक देश हमासला दहशतवादी संघटना म्हणतात. जरी हमासचे गाझा पट्टी क्षेत्रावरही राज्य आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या या घटना स्पर्धा परीक्षांमध्ये चालू घडामोडी आणि सामान्य ज्ञानाचा भाग बनतात. या घटनांची संपूर्ण माहिती जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

१९८७ मध्ये हमासची औपचारिक स्थापना झाली. किंबहुना १९७० सालापासून ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे. त्याला सुरुवातीचे खत-पाणी देण्याचे कामही इस्रायलने केले होते आणि आज भस्मासुरासारखा हमास इस्रायलच्या जनतेवर दारूगोळ्याचा पाऊस पाडत आहे.

१९४८ मध्ये इस्रायल अस्तित्वात आल्यावर पॅलेस्टाईनशी त्याचा संघर्ष सुरू झाला. दोघांमध्ये संघर्ष सुरूच होता. दरम्यान, इस्रायलला हे लक्षात आले की पॅलेस्टाईनकडून मुत्सद्दी पातळीवर एकप्रकारे तो कमकुवत होत आहे, त्यानंतर त्याने पॅलेस्टाईनच्या मध्यम नेत्यांसमोर कट्टरपंथी तरुणांचा एक गट उभा केला. त्याच वेळी त्याला हमास नाव देखील देण्यात आले.

इस्रायलने हमासला खत आणि पाणी पुरवणे सुरूच ठेवले. याचा खुलासा इस्रायलचे माजी लष्करी अधिकारी सजेव यांनी यापूर्वीच केला होता. इस्रायलने हमाससाठी बजेटमध्येही योग्य व्यवस्था केली होती. सेजवे हे १९८० च्या सुमारास गाझाचे गव्हर्नर देखील होते, जे आज हमासच्या नियंत्रणाखाली आहे.

बरं, हळुहळू हमासने पॅलेस्टाईनच्या संयमी नेत्यांना बाजूला सारले आणि पॅलेस्टाईनचाच झेंडा हाती घ्यायला सुरुवात केली. आता जेव्हा हमास स्वतः पॅलेस्टाईनचे नेतृत्व करण्यासाठी पुढे आला, तेव्हा साहजिकच त्याचे इस्रायलशी संबंध बिघडले आणि तो त्याचा शत्रू झाला. इस्रायल आणि हमास यांच्यातील तुरळक संघर्षाच्या कथा यापूर्वीही समोर येत आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ चा हल्ला पूर्वनियोजित होता.

भारतातील इस्रायली दूतावासाने रात्री उशिरा आपल्या सात नागरिकांच्या मृत्यूची पुष्टी केली. अनेक मुस्लिम देशांकडून हमासला आर्थिक मदतही मिळते. आपल्या एकाही नेत्याची जाहीर घोषणा केली नसली, तरी आज हमास एकजूट आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या संघटनेच्या सशस्त्र शाखेत २७ हजार लढवय्ये आहेत. हे सहा प्रादेशिक ब्रिगेड, २५ बटालियन आणि १०५ कंपन्यांमध्ये विभागले गेले आहेत. पॅलेस्टाईनचे तरुण हमासशी संबंधित आहेत.

हमासने आपली मोहीम सुरूच ठेवली आहे. स्वतःला बळकट करत राहिले. दरम्यान, २००६ मध्ये इस्रायलने गाझावरील ताबा हटवल्यानंतर हमासला आणखी बळ मिळाले. त्यानंतर येथे निवडणुका झाल्या, ज्यात हमासचा विजय झाला. त्याच्या स्थापनेपासून, हमासने हळूहळू स्वतःला मजबूत केले आहे. आणि इस्रायलने एकदा त्याला उठायला मदत केली होती, हेही तो विसरला. कारण आता हमासला अनेक मुस्लीम देशांकडून मदत मिळू लागली आहे आणि इस्रायलचा नाश करून तिथे इस्लामिक राष्ट्र स्थापन करणे, हे त्याचे अंतिम उद्दिष्ट आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून हमासने इस्रायलविरुद्ध खुलेआम युद्ध पुकारले आहे, जे आता स्फोटक स्वरूपात उलगडत आहे. जगातील अनेक देशांनी हमासला दहशतवादी घोषित केले आहे. इस्रायल आणि हमास आमनेसामने आल्यापासून दोन्ही बाजूंनी हजारो जीव गेले आहेत. सार्वजनिक डोमेनमध्ये उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, पॅलेस्टाईनमधील बहुतेक सामान्य लोक यात मारले गेले आहेत, परंतु इस्रायली लोकांचे रक्तही सांडले गेले आहे. ते अजूनही वाहत आहे.

# गुणवत्तेचा आलेख घसरला!

**शिक्षणावर आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा परिणाम होत असतो असे मानले जाते. अशा परिस्थितीत राज्यातील विविध संवर्गातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर नजर टाकली असता संवर्गातील संपादणूकीतील फरक लक्षणीय असल्याचे अधोरेखित होत नाही. गुणवत्ता ही कोणत्या एका संवर्गाची मक्तेदारी असते असेही यावरून म्हणता येत नाही हेही लक्षात घ्यायला हवे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण मिळाले, तर विद्यार्थी संपादणूक संपादन करू शकतात हे यानिमित्ताने पुन्हा समोर आले आहे.**




महाराष्ट्र सरकारच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणाचा अहवाल नुकताच जाहीर करण्यात आला. कोरोनानंतर राज्याच्या वतीने करण्यात आलेले हे पहिले मोठे सर्वेक्षण होते. राज्य परिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा उपयोग करत अध्ययन निष्पत्तीवर आधारित ११ हजार ९३३ शाळांमधील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात राज्यातील २ लाख ५३ हजार ४४९ विद्यार्थी सहभाग नोंदवला होता. सदरचे सर्वेक्षण हे नमुना निवडीच्या आधारे करण्यात आले. या सर्वेक्षणात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांचा सहभाग राहिला आहे. सर्वेक्षणात इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या शाळांपैकी इयत्ता तिसरीसाठी ३ हजार ७५६ शाळा, पाचवीसाठी ४ हजार ५० आणि आठवीकरिता ४ हजार १२७ शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्वेक्षणात या शाळांमधील विविध सामाजिक संवर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्याच्या या संपादणूक सर्वेक्षण अहवालात अपवादात्मक इयत्ता आणि एखादा विषय वगळता फार मोठा लक्षणीय आणि दखलपात्र फरक आढळून येत नाही.

केंद्र सरकारने २०१७ ला इयत्ता आणि विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती निश्रि्चत करून दिल्या आहेत. केंद्र आणि राज्य सरकार यापुढे जी सर्वेक्षणे करणार आहेत त्या सर्वेक्षणात अध्ययन निष्पत्तीचे मोजमाप केले जाणार आहे. या सर्वेक्षणातदेखील विषयांच्या अध्ययन निष्पत्तीचे मापन करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात ग्रामीण भागातील शाळांची गुणवत्ता अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे, तर त्याचवेळी खासगी व्यवस्थापनांच्या शाळांपेक्षा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा संपादणूकीचा आलेख अधिक उंचावला असल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर संवर्गनिहाय विद्यार्थ्यांचा विचार करता संपादणूकीत फार मोठा फरक असल्याचे प्रतिबिंबीत होत नाही. या राज्य सर्वेक्षणात सहभागी झालेल्या एकूण विद्यार्थ्यांचा विचार करता सर्वसाधारण संवर्गातील ६९ हजार ४१६ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. हे शेकडा प्रमाण २७.३९ टक्के इतके आहे. अनुसूचित जातीचे ४० हजार ६०३ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे शेकडा प्रमाण १६.०२ टक्के इतके आहे. अनुसूचित जमातीचे ४१ हजार ९१२ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे प्रमाण १६.५४ टक्के इतके असल्याचे दिसते आहे. इतर मागास प्रवर्गातील ५७ हजार ६६८ विद्यार्थी सहभागी झाले असून हे शेकडा प्रमाण २२.७५ टक्के इतके आहे. सर्वसाधारण संवर्गातील ६९ हजार ४१६ विद्यार्थी सहभागी असून हे शेकडा प्रमाण २७.३९ टक्के इतके आहे. भटके विमुक्त जाती जमाती संवर्गातील ३९ हजार ७९२ विद्यार्थी सहभागी झाले होते. ते शेकडा प्रमाण १५.७ टक्के इतके आहे. विशेष मागास प्रवर्गातील ४ हजार ५८ विद्यार्थी सहभागी झाले होते. हे शेकडा प्रमाण १.६ टक्के इतके आहे. सर्वाधिक विद्यार्थी सर्वसाधारण संवर्गातील सहभागी झालेले आहेत. त्या खालोखाल इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी सहभागी आहेत. अनुसूचित जातीचे विद्यार्थी कमी असून ते १६.०२ टक्के आहे, तर सर्वात कमी १.६ टक्के हे विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी आहेत. शिक्षणावर आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा परिणाम होत असतो असे मानले जाते. अशा परिस्थितीत राज्यातील विविध संवर्गातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवर नजर टाकली असता संवर्गातील संपादणूकीतील फरक लक्षणीय असल्याचे अधोरेखित होत नाही. गुणवत्ता ही कोणत्या एका संवर्गाची मक्तेदारी असते असेही यावरून म्हणता येत नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण मिळाले, तर विद्यार्थी संपादणूक संपादन करू शकतात हे यानिमित्ताने पुन्हा समोर आले आहे.

इयत्ता तिसरीत राज्याच्या भाषेचे सरासरी संपादणूक ७६.९९ टक्के आणि गणिताची ६८.५० टक्के इतकी आहे. सर्वसाधारण संवर्गातील विद्यार्थ्यांची संपादणूक सर्वाधिक आहे. भाषेत ७९.४ टक्के तर गणितात ७१.५ संपादणूक टक्के आहे. भाषेत सर्वात कमी संपादणूक ही अनुसूचित जमातीच्या संवर्गाची आहे. ती म्हणजे ७३.७ टक्के इतकी असून शेकडा ५ दशांस ७ टक्के इतका तो फरक आहे. इतर मागास आणि सर्वसाधारण संवर्गात अवघा १.६ टक्के फरक आहे.गणितात सर्वसाधारण आणि अनु.जमातीच्या संवर्गातील फरक ८.१ टक्के इतका आहे.तर सर्वसाधारण आणि इतर मागास प्रवर्गातील फरक १.६ टक्के इतका आहे. इयत्ता पाचवीच्या संपादणूकीचा विचार करता राज्याची भाषेची संपादणूक सरासरी ६२.२१ टक्के आहे, तर सर्वाधिक संपादणूक ही इतर मागास प्रवर्गातील आहे. ती ६२.१९ टक्के इतकी आहे. सर्वात कमी संपादणूक भटक्या विमुक्त जाती जमातीची असून ती ६१.१५ टक्के इतकी आहे. यातील फरक १.०४ इतकी आहे. गणिताची राज्याची सरासरी ६४.४७ टक्के असून सर्वाधिक संपादणूक इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आहे. त्या संवर्गाचे शेकडा प्रमाण ६४.९५ टक्के आहे. सर्वात कमी संपादणूक अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांची असून हे शेकडा प्रमाण ६२.२४टक्के इतके आहे. यातील फरक २.६८ टक्के इतका आहे. आठवीची भाषा विषयाची सरासरी संपादणूक ६९.५२ टक्के आहे. भाषेत सर्वसाधारण संवर्गातील विद्यार्थ्यांची संपादणूक सर्वात जास्त आहे ती ७२.७४ टक्के इतकी आहे. सर्वात कमी ६६.३८ टक्के ही अनुसूचित जमातीची आहे.यातील फरक ६.३६ टक्के इतका आहे.गणिताची राज्याची सरासरी संपादणूक ४९.१० टक्के आहे.येथे सर्वाधिक संपादणूक सर्वसाधारण संवर्गातील असून ते प्रमाण ४९.२४ इतके आहे.तर सर्वात कमी ४६.७८ टक्के संपादणूक असून हे अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांचे आहे.हा फरक अवघा २.४६ टक्के आहे.

राज्यात दहावी, बारावी प्रमाणे प्राथमिक स्तरावरदेखील संपादणूक पातळीत संपादनात मुलींची आघाडी असल्याचे समोर आले आहे. या सर्वेक्षणात १ लाख २३ हजार १०९ विद्यार्थी आणि एक लाख ३० हजार ३४० विद्यार्थिनी सहभागी झाले होता. शेकडा प्रमाणाचा विचार करता ४८.५७ टक्के विद्यार्थी आणि ५१.४३ टक्के विद्यार्थिनींचे प्रमाण आहे. इयत्ता तिसरीत भाषा विषयातील विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ७६.१२ टक्के आहे. विद्यार्थिनींची संपादणूक ७७.८३ टक्के आहे. गणितात विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६७.६७ टक्के, तर विद्यार्थिनींची संपादणूक ६८.९८ टक्के इतकी आहे. इयत्ता पाचवीसाठी मराठी भाषेत विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६१.३ टक्के आहे. विद्यार्थिनींची सरासरी ६३.३७ टक्के आहे. गणित विषयाचा विचार करता विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६२.७२ टक्के, तर विद्यार्थिनींची सरासरी संपादणूक ६४.४६ टक्के आहे. इयत्ता आठवीसाठी मराठी विषया संदर्भात विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ६८.८० टक्के, तर विद्यार्थिनींची सरासरी संपादणूक ७०.९८ टक्के आहे. गणित विषयात विद्यार्थ्यांची सरासरी ४८.२७ टक्के असून विद्यार्थिनींची ४८.६७ टक्के आहे. या सर्व विषयांच्या संपादणूकीच्या आकडेवारीवर विचार केला, तर विद्यार्थिनींची संपादणूक सर्वच विषयांमध्ये अधिक आहे. शैक्षणिक संपादणूकीचा विचार करता मुलींचा हा वरचष्मा विद्यार्थी आणि पालकांना निश्रि्चत विचार करायला भाग पाडणारा आहे. एकीकडे विद्यार्थ्यांसाठी पालक अधिकाधिक चिंता वाहत आहेत. आपल्या समाजात नाही म्हटले तरी मुलगा आणि मुलगी असा भेद कायद्याने होत नसला तर मनात आहे. अर्थात सर्वच पालकांच्या मनात हा भेद आहे असे नाही, मात्र भेद केला जात नाही असे म्हणणे धाडसाचे होईल. अशा परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाच्याबाबतीत पालक अधिक दक्षता घेताना दिसतात. मुलासाठी शिकवणीबरोबर इतरही गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर केली जात असते. असे असतानादेखील मुलांचा गुणवत्तेचा मात्र आलेख घसरलेला दिसतो आहे. खरंतर यामागील कारणांचा संशोधनाची गरज आहे. राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कोरोनानंतर काही प्रमाणात सुधारत असल्याचे प्रतिबिंबीत होत आहे, मात्र शंभर टक्के शैक्षणिक संपादन प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे.

# वैद्यकीय महाविद्यालये संलग्नित रुग्णालयांची सुरक्षा महागली!; सरकारी तिजोरीवर अतिरिक्त बोजा



मुंबई : गेल्या काही वर्षांपासून रुग्णांच्या नातेवाइकांकडून डॉक्टरांवर हल्ल्याच्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत. त्यामुळे डॉक्टरांना संरक्षण मिळावे यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाकडून १४ वैद्यकीय महाविद्यालयांसाठी सुरक्षारक्षक सेवा घेतली होती. आता या सुरक्षारक्षकांच्या वेतनात तीन हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता सरकारी तिजोरीवर महिन्याला अतिरिक्त बोजा पडणार आहे.

डॉक्टरवर वारंवार होणारे हल्ले आणि नातेवाइकांकडून रुग्णालयाची होणारी तोडफोड त्याअनुषंगाने २०१५ साली मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर निकाल देताना उच्च न्यायालयाने डॉक्टरांच्या सुरक्षेकरिता उपाययोजना करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार २०१७ साली १४ शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये एकूण १०८८ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

२०१८ साली महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या झालेल्या बैठकीनंतर २०१९ पासून सर्व पदांकरिता ३००० रुपये प्रतिमाह वाढविले असल्याने सुधारित दर आकारण्यात येणार असल्याचे विभागाला कळविले होते. महामंडळाने कळविलेल्या माहितीच्या अनुषंगाने आता ३००० रुपये वाढीव दरानुसार देय असलेले मानधन देण्याचा विभागाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता १०८८ सुरक्षारक्षकांच्या पगारात वाढ झाल्यामुळे सरकारी तिजोरीवर महिन्याला ३२ लाख ६४ हजारांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

**सुरक्षा रक्षकांची नेमणूक का?**

रुग्ण दगावल्यानंतर नातेवाइकांकडून निवासी डॉक्टरांना मारहाण होण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षांपासून वाढ झाली आहे. विशेषत: शासकीय रुग्णालयातील निवासी डॉक्टरांना मारहाण होतना दिसते. या घटनांना आळा घालण्याकरिता सरकारने २०१७ साली १४ वैद्यकीय महाविद्यालयांत व रुग्णालयात अतिरिक्त सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय घेतला होता.

# महाराष्ट्र सरकारने वाढवली शाहरुख खानची सुरक्षा, पठाण-जवानच्या यशानंतर येत होते धमकीचे फोन




बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानच्या सुरक्षेत महाराष्ट्र सरकारने वाढ केली आहे. शाहरुखने राज्य सरकारकडे लेखी तक्रार केली होती की, त्याच्या पठाण आणि जवान या चित्रपटांच्या यशानंतर त्याला धमकीचे फोन येत आहेत. त्यानंतर त्याची सुरक्षा वाढवण्यासाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. शाहरुखची सुरक्षा Y+ करण्यात आली आहे.

शाहरुख खानच्या लेखी तक्रारीनंतर राज्य सरकारच्या आदेशानुसार आयजींनी व्हीआयपी सुरक्षेचे आदेश दिले असून अभिनेत्याची सुरक्षा वाढवण्यास सांगितले आहे. शाहरुख खान या सुरक्षेचे पैसे देणार आहे. म्हणजेच यासाठी त्याला सरकारला पैसे द्यावे लागतील.

२०२३ हे वर्ष शाहरुख खानसाठी खूप छान असणार आहे. वर्षाच्या सुरुवातीला पठाण आणि नंतर जवान. त्याच्या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर कमाईच्या बाबतीत वेगळा विक्रम केला. या दोन्ही चित्रपटांच्या यशानंतर शाहरुखने राज्य सरकारकडे केलेल्या लेखी तक्रारीत म्हटले आहे की, त्याला धमकीचे फोन आले होते.

पठाण २५ जानेवारी २०२३ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर अंदाजे १०५० कोटींची कमाई केली होती. त्याच्या दुसऱ्या चित्रपटाने म्हणजेच जवानने पठाणचा विक्रमही मोडला. ७ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने आतापर्यंत ११०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. जवान हा आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट ठरला आहे. ॲटली यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. दोन ब्लॉकबस्टर दिल्यानंतर, शाहरुखकडे अजून एक चित्रपट आहे, जो यावर्षी डिसेंबर महिन्यात प्रदर्शित होणार आहे. त्याचा डंकी हा चित्रपट राजकुमार हिरानी दिग्दर्शित करत आहेत. त्याचे चाहते त्याच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# इस्त्रायल-हमास युद्धामुळे महाग होणार सोने, या कारणामुळे वाढणार भाव!

इस्रायल आणि हमास यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. इस्रायलचा हमासवर बॉम्बफेक सुरूच आहे. दोन्ही देशांमध्ये सुरू झालेल्या या युद्धामुळे जगभरातील गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे. या युद्धाचा परिणाम आता सोन्या-चांदीच्या कमोडिटी मार्केटवरही दिसून येत आहे. बाजारात सोन्याची मागणी झपाट्याने वाढली आहे, त्यामुळे सोन्या-चांदीचा प्रीमियम झपाट्याने वाढला आहे. त्याचबरोबर युद्धामुळे शेअर बाजारात घसरण होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, भौगोलिक-राजकीय तणाव वाढल्यामुळे सोने, चांदी आणि डॉलरमध्ये वाढ होऊ शकते.




इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धानंतर सोन्याचा प्रीमियम प्रति १० ग्रॅम ७०० ते २००० रुपयांनी वाढला आहे. पूर्वी ते १३०० रुपये प्रति १० ग्रॅम होते. तो इतका झपाट्याने वाढला आहे की काही ठिकाणी सराफा व्यापाऱ्यांना सोने विकण्यास मनाई करण्यात आली आहे.

किंबहुना, जगभरात युद्ध आणि आर्थिक संकट असताना सोन्याची मागणी वाढते. युद्ध किंवा आर्थिक संकटामुळे गुंतवणूकदार सोन्याला सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय मानतात. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, स्पार्टन कॅपिटल सिक्युरिटीजचे मुख्य बाजार अर्थशास्त्रज्ञ पीटर कार्डिलो म्हणतात की, आंतरराष्ट्रीय गोंधळाच्या काळात गुंतवणूक पोर्टफोलिओचे संरक्षण करण्यासाठी सोने हा एक चांगला पर्याय आहे. सोन्याव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय गोंधळाच्या काळात डॉलर देखील मजबूत होतो.

भारतात सणासुदीचा हंगाम सुरू असताना इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध सुरू झाले आहे. दोन्ही देशांमधील युद्धानंतर सोन्या-चांदीची मागणी झपाट्याने वाढत आहे. सणासुदीच्या काळात भारतात सोन्या-चांदीची मागणी वाढू शकते, त्यामुळे या धातूंच्या किमतीत मोठी वाढ होऊ शकते. म्हणजेच सणासुदीच्या काळात सोने खरेदी करणे तुम्हाला महागात पडू शकते.

त्याच वेळी, अलीकडेच सोने त्याच्या उच्च पातळीपासून सुमारे ५ हजार अंकांनी आणि चांदी त्याच्या उच्च पातळीपासून १३००० अंकांनी घसरली आहे. या कारणास्तव दुकानदार आणि गुंतवणूकदार सोन्या-चांदीवर अधिक लक्ष केंद्रित करतात. ग्राहक आणि गुंतवणूकदारांमधील वस्तूंची मागणी पाहता, सोन्याचे व्यापारी सध्या सोने-चांदीची विक्री करू इच्छित नाहीत.

खइग- वेबसाइटनुसार, सराफा बाजारात गेल्या ट्रेडिंग आठवड्यात, २४ कॅरेट सोन्याचा भाव ५६,५३९ रुपये, २२ कॅरेटचा भाव ५१,७९० रुपये आणि १८ कॅरेटचा भाव ४२,४०४ रुपये प्रति १० ग्रॅम होता. तर चांदीचा दर ६७,०९५ रुपये प्रति किलो आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य



## न खातापिताही वजन वाढतंय? ही आहेत कारणं

आपण लठ्ठपणाचा किंवा वजन वाढण्याचा विचार करतो तेव्हा आपल्या डोळ्यासमोर दोन गोष्टी येतात. एक म्हणजे अनारोग्यकारक अन्न म्हणजेच अनहेल्दी फूड आणि बैठी जीवनशैली. पण वजन वाढण्यामागे आणखी एक कारण आहे. आणि बरेच लोक या गोष्टीपासून अनभिज्ञ आहेत.

म्हणजे आपण चांगला, पौष्टिक आणि सकस आहार घेतला तरी इतर कारणांमुळे आपलं वजन वाढू शकतं.

वातावरणातील काही घटक वजन वाढण्यात आणि लठ्ठपणासाठी कारणीभूत असल्याचं काही अभ्यासांमधून समोर आलंय.

या रासायनिक घटकांना 'ऑब्सोजेन्स' म्हणतात.

अन्न पचविण्याची क्षमता मंदावल्याने किंवा प्रदूषित हवेत श्वास घेतल्याने आपलं वजन वाढू शकतं.

आतापर्यंत अशी ५० रासायनिक संयुगं समोर आली आहेत ज्यांना 'ऑब्सोजेन्स' किंवा 'संभाव्य ऑब्सोजेन्स' मानलं जातंय.

बिस्फेनॉल ए, पॉलीब्रोमिनेटेड बायफेनिल्स, पॉलीक्लोरिनेटेड डायफेनिल इथर, परफ्लुओरो अल्काइलेटेड घटक, पॅराबेन्स, ऍक्रिलामाइड, अल्किलफेनॉल, डिब्युटिल्टिन, कॅडमियम आणि आर्सेनिक यासारखे रासायनिक घटक वजन वाढण्यास कारणीभूत ठरत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे हे सर्व रासायनिक घटक आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या डिटर्जंट पावडर, खाद्यपदार्थ, प्लास्टिकचे डबे, कपडे आणि सौंदर्यप्रसाधने या वस्तूंमध्ये आढळतात.

**या घटकांमुळे वजन कसं वाढतं?**

हे घटक स्वतः वजन वाढवत नाहीत, तर वेगवेगळ्या मार्गाने हे घटक वजन वाढण्यास कारणीभूत ठरतात.

उदाहरणार्थ, ते ऍडिपोसाइट्स नावाच्या मेद पेशींना उत्तेजित करतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर शरीरातील मेदासाठी जबाबदार असलेल्या पेशींचा आकार आणि संख्या वाढवतात.

पांढर्‍या ऍडिपोज टिश्यू (चरबी) ची वाढ एखाद्या व्यक्तीच्या शरीराच्या विकासाशी संबंधित रोगांना आमंत्रण देऊ शकते. यामुळे शरीराच्या विविध अवयवांमध्ये विशेषतः यकृतामध्ये ग्लुकोज, आम्ल आणि मेद साठू लागतात.

त्याचप्रमाणे, या ऍडिपोसाइट्सच्या परस्परसंवादामुळे थायरॉईड संप्रेरकांच्या कार्यामध्ये बदल झाल्याचे आढळून आले आहे.

याव्यतिरिक्त, ही रसायने आतड्याच्या मायक्रोबायोटावर परिणाम करतात.

मायक्रोबायोटा हे कोट्यवधी बॅक्टेरिया आहेत जे कॅलिफॉर्म्स नावाच्या लिपिड्सचे शोषण नियंत्रित करतात. या बॅक्टेरियाची घट झाल्यास टाईप-२ मधुमेह किंवा लठ्ठपणा यासारख्या रोगांना आमंत्रण मिळते.

कॅलिफॉर्म्स लिपिड्सचे शोषण नियंत्रित करून कार्य करतात.

**हा धोका कसा वाढतो?**

आपण ऑब्सोजेन्सच्या संपर्कात कधी येतो यावर धोका अवलंबून असतो.

आपल्या आयुष्याचा प्रारंभिक टप्पा अत्यंत संवेदनशील असतो. एखाद्या व्यक्तीचा सर्वात जलद विकास हा गर्भाशयात असताना किंवा लहानपणी होत असतो. जर या काळात आपण ऑब्सोजेन्सच्या संपर्कात आलो तर त्याचे परिणाम दीर्घकाळ टिकणारे असतात.

सुरुवातीच्या विकासादरम्यान आपण या रासायनिक घटकांच्या संपर्कात आलो तर शारीरिक बदल होऊ शकतात आणि व्यक्तीला आजीवन रोगांचा धोका उद्भवू शकतो.

वर नमूद केलेल्या गोष्टींचा थेट नसला तरी शरीरावर परिणाम होतोच.

अशाच उत्परिवर्तनामुळे लठ्ठपणा येऊ शकतो का? या प्रश्नाला वैज्ञानिक पुरावे यासाठी होकार दर्शवतात.

शारीरिक विकासाच्या काळात वर नमूद केलेल्या रासायनिक घटकांच्या संपर्कात आल्यास अनुवांशिक बदल होऊ शकतात. याला एपिजेनेटिक बदल म्हणतात.

शरीराच्या पेशींमध्ये असलेल्या जनुकांमधील गुणधर्म व्यक्त करण्याचा मार्ग बदलू शकतो. त्यामुळे ज्यामुळे पेशींची कार्यही बदलू शकतात. यामुळे लठ्ठपणा आणि इतर रोगांचा धोका देखील वाढू शकतो.

आता ही समस्या इथेच संपते असं नाही. प्राण्यांवर केलेल्या संशोधनात असं आढळून आलं आहे की, हे बदल पुढील पिढ्यांमध्ये टिकून राहतात. त्यामुळे या बदलांना आनुवंशिक बदल असंही म्हणता येईल.

**ऑब्सोजेन्स पासून सुरक्षित कसं राहायचं?**

वर सांगितल्याप्रमाणे, ऑब्सोजेन्स आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. आपण काही गोष्टी टाळून यापासून अंतर राखू शकतो.

बिडी सिगारेट ओढू नका

हवाबंद पदार्थ (पॅकेज फूड) आणि शीतपेयांचा वापर कमीत कमी करा

प्लास्टिक, सौंदर्यप्रसाधने आणि लोशनचा वापर कमीत कमी करा

कीटकनाशक असलेल्या उत्पादनांचा वापर कमी करा

शक्य तितक्या वस्तूंचा पुनर्वापर करा

महत्त्वाचं म्हणजे, सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांनी अशा पदार्थांच्या मर्यादित वापराबाबत धोरण तयार करायला हवं. आरोग्य क्षेत्रातील सध्याच्या सामाजिक असमानतेकडेही लक्ष दिलं पाहिजे.

## तुम्ही खात असलेलं तूप शुद्ध आहे की भेसळयुक्त? कसं ओळखायचं?



गुजरातमधील बनासकांठा येथील प्रसिद्ध अंबाजी मंदिरात भाविकांच्या प्रसादासाठी मोहनथाळ बनवण्याचा खाजगी कंपनीच्या प्रसादात भेसळयुक्त तूप वापरण्याचं प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे.

'मोहिनी केटरर्स' नावाच्या एका खासगी कंपनीला मोहनथाळचा प्रसाद भाविकांसाठी बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती, मात्र राज्याच्या अन्न आणि औषध नियंत्रण प्रशासनानं (एफडीसीए) केलेल्या तपासणीत प्रसादात वापरल्या जाणाऱ्या तुपाच्या शुद्धतेबाबत धक्कादायक तथ्य समोर आणलं आहे.

मोहिनी केटरर्सनं मधुपुरा येथील एका खासगी कंपनीमार्फत निकृष्ट दर्जाचं तूप खरेदी करून कंटेनरवर अमूलचं बनावट ब्रँडिंग केल्याचं तपासात उघड झालं आहे.

अन्न आणि औषध नियंत्रण प्रशासनाचे आयुक्त एच.जी. कोशिया यांनी टाईम्स ऑफ इंडियाला सांगितलं की, मोहिनी केटरर्सकडून १५ सप्टेंबर रोजी जप्त केलेल्या तुपाचे नमुने निकृष्ट दर्जाचे असल्याचं आढळलं. मात्र भाविकांमध्ये घबराट पसरू नये, म्हणून रिपोर्ट जाहीर करण्यात आला नाही.

या वादामुळं आता नकली तुपाचा मुद्दा चर्चेचा विषय बनला असताना, बीबीसीनं भेसळयुक्त तूप कसं बनतं आणि ते कसं ओळखावं याची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला.

**भेसळयुक्त तूप कसं बनतं?**

राजकोट महानगरपालिकेच्या आरोग्य शाखेतील उप आरोग्य अधिकारी डॉ. हार्दिक मेहता यांनी बीबीसी गुजरातीशी बोलताना, कमी गुंतवणुकीत जास्त पैसे मिळवण्यासाठी काही लोक भेसळयुक्त वस्तू बनवण्यासाठी वापरत असलेल्या वस्तूंची माहिती दिली.

ते म्हणाले की, बनावट तूप तयार करण्यासाठी विविध प्रकारचं वनस्पती तूप आणि तिळाचं तेल मोठ्या प्रमाणात वापरलं जातं. ही पद्धत नकली तुपाचं मिश्रण आणि त्याला चिकटपणा येण्यासाठी प्रभावी ठरतं.

शिवाय, ते सांगतात की बनावट तुपाला देखील खऱ्या तुपासारखाच सुगंध आणि चव आणतात. यामुळं, बहुतेक प्रकरणांमध्ये बनावट तुपाचा वास शुद्ध तुपासारखाच असतो. बनावट तूप वापरण्याच्या धोक्यांबद्दल बोलताना डॉ. हार्दिक म्हणतात, बनावट तुपाचा दीर्घकाळ वापर केल्यानं हृदयविकार आणि पक्षाघात यांसारखे गंभीर दीर्घकालीन आजार होऊ शकतात.

बाजारपेठेतील भेसळयुक्त तुपापासून सावध राहण्याचा सल्ला देत ते म्हणाले, 'बाजारात उपलब्ध असलेलं नकली तूप, जे ओरिजिनल दिसतं, ते अनेकदा कमी किमतीत विकलं जातं. त्यामुळं ग्राहकांनी खरेदी करताना अत्यंत सावध असणं आवश्यक आहे.

शुद्ध तूप आणि नकली तूप यातील फरक करताना ग्राहकांना भेडसावणाऱ्या संभ्रमाबाबत ते सांगतात,

लोकांच्या मनात शंका येऊ नये, म्हणून अनेक वेळा बनावट तूपही शुद्ध तुपाच्या किंमतीला विकलं जातं. तूप पाहिल्यानंतरही ते शुद्ध आहे की भेसळयुक्त हे ओळखणं कठीण आहे. त्यामुळं तूप खरेदी करताना खूप काळजी घेण्याची गरज आहे.

अस्सल तुपाला आयएसआय (ISI) मार्किंग आणि एफएसएसएआय (FSSAI) नोंदणी क्रमांक किंवा परवाना क्रमांक असतो. याशिवाय पॅकवरील पोषण तक्ता, घटक इत्यादी पाहूनच उत्पादन खरेदी करावं.

**भेसळयुक्त तुपाची खरेदी टाळण्यासाठी काय करावं?**

भेसळयुक्त तूप ओळखण्यासाठीच्या चाचणीबद्दल बोलताना, गुजरात अन्न आणि औषध प्रशासनाच्या माजी उपायुक्त दीपिका चौहान या सांगतात की, पूर्वी वनस्पती तूप आणि तिळाच्या तेलापासून बनवलेलं भेसळयुक्त तूप शोधण्यासाठी बाउडोइन टेस्ट (Baudouin test) आणि तुपाची आरएम व्हॅल्यू (RM value) यांसारख्या चाचण्यांवर अवलंबून होतो. पण ही चाचणी टाळण्यासाठी अनेक पळवाटा आणि पद्धती विकसित केल्या गेल्या. मात्र, आता गॅस क्रोमॅटोग्राफी पद्धतीनं तुपातील वनस्पती तुपाचं अस्तित्व शोधलं जातं.

अस्सल तूप ओळखण्यासाठी सामान्य ग्राहकानं करायच्या उपायांबद्दल बोलताना त्या सांगतात, वर नमूद केलेल्या सर्व पद्धती प्रयोगशाळेद्वारे शक्य आहेत. सध्या अशी कोणतीही व्यवस्था नाही की ज्याद्वारे ग्राहकांना खऱ्या आणि नकली तुपात सहज फरक करता येईल. पण भेसळयुक्त तूप खरेदी टाळण्यासाठी आपण चांगल्या दुकानातून किंवा ब्रँडचं तूप खरेदी करत आहोत याची खात्री करून घ्या. तसंच सुटं तूप खरेदी न करता चांगल्या ब्रँडचं पॅकेजिंग केलेलं तूप घ्यावं.

## डेंग्यू आणि मलेरियासह या ४ आजारांवर पपईचे पान रामबाण उपाय

पपई आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. अनेक आजारांमध्ये पपई खाण्याचा सल्ला दिला जातो. पपई पोट आणि पचनक्रिया सुधारण्यासाठी औषधाप्रमाणे काम करते. तथापि केवळ पपईच नाही तर पपईची पाने देखील आरोग्यासाठी खूप चांगली आहेत. या पानांमध्ये व्हिटॅमिन –, उ, ए, घ, इ१२ आणि कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम आणि लोह भरपूर प्रमाणात असते. पपईच्या पानांचे हे गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. त्यांचा रस प्यायल्याने ५ मोठ्या आजारांपासून आराम मिळतो. आम्ही तुम्हाला पपईच्या पानांचा रस पिण्याचे फायदे सांगत आहोत.

**या आजारांमध्ये पपईची पाने फायदेशीर आहेत**

डेंग्यू- एडीज डास चावल्यामुळे डेंग्यू होतो. सामान्य तापाप्रमाणेच हा डेंग्यू आजारही अत्यंत घातक आहे. डेंग्यूमध्ये रक्तातील प्लेटलेट्स झपाट्याने कमी होऊ लागतात. अशा परिस्थितीत डेंग्यूच्या रुग्णांसाठी पपईची पाने खूप फायदेशीर आहेत. या पानांचा रस प्यायल्याने प्लेटलेट्सची संख्या झपाट्याने वाढवता येते.

मलेरिया- डेंग्यू आणि मलेरिया या दोन्हींमध्ये पपईची पाने फायदेशीर आहेत. या पानात आढळणारे गुणधर्म मलेरियाशी लढण्यास मदत करतात. मलेरियाच्या रुग्णाला पपईच्या पानांचा रस दिल्यास मलेरियाची लक्षणे कमी होऊ शकतात.

मधुमेह- मधुमेहाच्या रुग्णांसाठीही पपईची पाने खूप फायदेशीर आहेत, त्याचा रस प्यायल्याने साखरेची पातळी



नियंत्रित राहते. ही पाने साखरेवर औषधाप्रमाणे काम करतात. पपईच्या पानांचा रस प्यायल्याने साखर वाढण्यापासून बचाव होतो.

पचन- पचनाच्या समस्यांवरही हे फायदेशीर आहे. पपईच्या पानांचा रस पचनक्रियेसोबतच यकृत, केसांची वाढ आणि सांधेदुखीपासून आराम यासाठीही फायदेशीर आहे.

अस्वीकरण: आमचा लेख केवळ माहिती प्रदान करण्यासाठी आहे. अधिक माहितीसाठी नेहमी तज्ञ किंवा तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## डोळे निरोगी आणि दृष्टी चांगली ठेवण्यासाठी, या टिप्स अवलंबवा

डोळे हे देवाने दिलेली देणगी आहेत, ते शरीराचा एक भाग आहेत ज्यामुळे आपल्याला जगाचे सौंदर्य जाणवते. मात्र, काळानंतराने जीवनशैली आणि आहारातील विस्कळीतपणामुळे त्याच्याशी संबंधित धोके वाढत आहेत. मोबाईल कॉम्प्युटरवर जास्त वेळ घालवणे असो किंवा मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या अंतर्निहित आरोग्य स्थिती असो, या सर्वांचा डोळ्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे.

डोळ्यांशी संबंधित वाढत्या आरोग्य समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधून घेणे आणि प्रतिबंधाबाबत जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी.जागतिक दृष्टी दिवस साजरा केला जातो. या वर्षीची थीम 'तुमच्या डोळ्यांवर प्रेम करा', कामाच्या ठिकाणी डोळ्यांच्या आरोग्याकडे लक्ष द्या.



**डोळ्यांसाठी चांगला आहार घ्या -**

डोळे निरोगी ठेवण्यासाठी तुमचा आहार निरोगी आणि पौष्टिक असणे सर्वात महत्त्वाचे आहे. रंगीबेरंगी भाज्या आणि फळे आपल्या रोजच्या आहाराचा भाग बनवा. ओमेगा-३ फॅटी ऍसिड्स, ल्युटीन, झिंक आणि जीवनसत्त्वे सी आणि ई यांसारखे पोषक घटक मॅक्युलर डिजेनेरेशन आणि मोतीबिंदू यांसारख्या वयोमानाशी संबंधित दृष्टी समस्या दूर करण्यास मदत करतात. हिरव्या पालेभाज्या जसे पालक, काळे आणि कोलार्ड्स, फॅटी फिश, अंडी, नट, बीन्स इत्यादी डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

**धूम्रपानापासून दूर राहा-**

धूम्रपान केवळ फुफ्फुसांसाठीच हानिकारक नाही, तर त्याचा डोळ्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो.धूम्रपानामुळे मोतीबिंदू, ऑप्टिक नर्व्हचे नुकसान आणि मॅक्युलर डिजेनेरेशनचा धोका वाढतो.

धूम्रपान सोडल्यास असे धोके कमी करता येतात.जे दीर्घकाळ तुमची दृष्टी निरोगी ठेवण्यास मदत करू शकते.

**स्क्रीन वेळ कमी करा-**

जे लोक स्क्रीनवर जास्त वेळ घालवतात त्यांना कालांतराने डोळ्यांशी संबंधित विविध आजार होण्याचा धोका असतो. मोबाईल-कॉम्प्युटर किंवा टेलिव्हिजन यांसारख्या स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश डोळ्यांसाठी खूप घातक ठरू शकतो.पापण्या लुकलुकत राहणे देखील खूप महत्वाचे आहे.

**नियमित डोळ्यांची तपासणी करा-**

आरोग्य तज्ञ म्हणतात की प्रत्येकासाठी, अगदी लहान मुलांसाठी देखील नियमित डोळ्यांची तपासणी आवश्यक आहे. तुमच्या डोळ्यांमध्ये होणारी कोणतीही समस्या ओळखणे आणि वेळेत ती दुरुस्त करणे हे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी डोळे तपासावेत.

## काही मुलांच्या हृदयाला छिद्र का असतं? यावर काही उपचार आहेत का?

एखाद्या व्यक्तीच्या हृदयात छिद्र असणं हा मुळात जन्मजात दोष आहे. हे छिद्र गर्भधारणेदरम्यान बाळाच्या हृदयाच्या विकासातील समस्यांमुळे होऊ शकतं.

जर समस्या लवकर समजली तर, त्वरित उपचाराने मूल पूर्णपणे बरं होतं. पण उपचाराला उशीर झाला तर मात्र यातील गुंतागुंत वाढते.

हृदयात छिद्र कोणत्या ठिकाणी आहे आणि ते किती मोठं आहे यावर उपचार अवलंबून असतात.

यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल आणि यूके डिपार्टमेंट ऑफ हेल्थ – एनएचएस आणि तज्ज्ञ डॉक्टरांनी हृदयाच्या छिद्राबद्दल तपशीलवार माहिती गोळा केली आहे.

**हृदयात छिद्र**

मानवी हृदयाला चार कप्पे असतात. वरच्या विभागांना अनुक्रमे उजवा आणि डावा अलिंद आणि खालच्यांना अनुक्रमे उजवा आणि डावा निलय असे म्हणतात.

वरच्या दोन अलिंदांना वेगळं करणाऱ्या पडद्याला 'इंटरएट्रिअल सेप्टम' म्हटलं जातं. तर खालच्या निलयांना विभागणाऱ्या पडद्यांना 'इंटरव्हेंट्रिक्युलर सेप्टम' म्हटलं जातं.

जन्मतःच लहान मुलांच्या हृदयाच्या एखाद्या कप्प्यात छिद्र असू शकतं. वरच्या 'ट्रियल सेप्टम'मधील छिद्राला 'ट्रियल सेप्टल डिफेक्ट' म्हणतात. खालच्या सेप्टममधील छिद्राला 'वेंट्रिक्युलर सेप्टल डिफेक्ट'



म्हणतात.

या छिद्रांमुळे हृदय आणि फुफ्फुसांदरम्यान रक्त प्रवाह होतो.

मानवी शरीराची फुफ्फुसे रक्त तयार होण्यासाठी ऑक्सिजन पुरवतात. आणि ते ऑक्सिजनयुक्त रक्त संपूर्ण शरीरात पोहोचवण्याचे काम हृदय करते.

शरीरातील दूषित रक्त प्रथम महाधमनी आणि नंतर उजव्या निलयाद्वारे हृदयाच्या उजव्या अलिंदामध्ये आणले जाते. या निलयातील दूषित रक्त फुफ्फुसाच्या धमन्यांमधून फुफ्फुसात पोहोचते.

फुफ्फुसे दूषित रक्ताला ऑक्सिजनचा पुरवठा करतात. नंतर फुफ्फुसातून शुद्ध केलेले रक्त हृदयाच्या डाव्या अलिंद आणि नंतर डाव्या निलयात प्रवेश करते. हृदयाच्या डाव्या निलयातून हे ऑक्सिजनयुक्त शुद्ध रक्त महाधमनीद्वारे संपूर्ण शरीरात वाहते.

जर हृदयाला 'ट्रियल सेप्टल डिफेक्ट' असेल तर फुफ्फुसातून होणारा रक्तप्रवाह असामान्य असतो. कारण हे छिद्र रक्ताच्या सामान्य प्रवाहात अडथळा आणते.

ऑक्सिजनयुक्त शुद्ध रक्त डाव्या अलिंदामध्ये वाहते, परंतु छिद्र असेल तर थोडं शुद्ध रक्त उजव्या अलिंदामध्ये ही वाहते. हे शुद्ध रक्त दूषित रक्तामध्ये मिसळते आणि फुफ्फुसात वाहणाऱ्या रक्ताचे प्रमाण वाढवते.

जर छिद्र मोठे असेल आणि खूप वर्षांपासून असेल तर हृदय आणि फुफ्फुसांना धोका उद्भवू शकतो.

यामुळे फुफ्फुसाच्या धमन्यांमध्ये रक्तदाब वाढतो. त्यानंतर हृदयाला रक्त पंप करण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागते. यामुळे हृदयाच्या झडपांवर अतिरिक्त दबाव येतो. परिणामी हृदयाच्या झडपा खराब होतात.

या व्यतिरिक्त, फुफ्फुसाच्या धमन्यांवर उच्च दाब येऊन फुफ्फुसाचे कायमचे नुकसान होऊ शकते. आणि फुफ्फुसे ऑक्सिजन पुरवण्यात अपयशी ठरतात.

यामुळे रुग्णाचा मृत्यू ओढवू शकतो.

**बाळाच्या हृदयात छिद्र का असतं?**

हृदयाला छिद्र पडणं हा जन्मजात दोष आहे. म्हणजेच, मूल जन्माला येतानाच त्याच्या हृदयात छिद्र असण्याची शक्यता असते. बाह्य कारणांमुळे हृदयाला छिद्र पडल्याचे कोणतेही पुरावे अस्तित्वात नाहीत.

गर्भाशयात, बाळाचे हृदय एका नळीद्वारे विकसित होत असते. ती नळी नंतर चार कप्प्यांमध्ये विभागली जाते. या कप्प्यांचे दोन भाग वेगळे करण्यासाठी पडदा लावला जातो.

जर या प्रक्रियेदरम्यान काही अडचणी आल्या तर छिद्र पडू शकतात असं बांगलादेश चिल्ड्रन हॉस्पिटलच्या चाइल्ड कार्डिओलॉजी विभागाच्या प्रमुख आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. खलिफा महमूद तारिक सांगतात.

डाउन सिंड्रोमसारख्या अनुवांशिक समस्यांमुळे बाळाच्या हृदयाला छिद्र पडू शकते.

याशिवाय, गरोदरपणाच्या पहिल्या काही महिन्यांत आईला रुबेला झाला असेल, तर बाळाच्या हृदयाला छिद्र पडण्याचा धोका किंवा हृदयाच्या समस्या उद्भवू शकतात.

आईला अनियंत्रित मधुमेह असेल किंवा गरोदरपणात मातेला विषाणूजन्य संसर्ग झाला असेल किंवा गरोदरपणात माता कुपोषणाने पीडित असेल तर बाळाला हृदयाच्या समस्येचा धोका संभवतो.

आईला अल्कोहोल आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्याची सवय असेल किंवा औषध सुरू असतील तर त्याचा परिणाम होऊ शकतो.

तसेच, गरोदरपणात फिट येणारी औषधे, कोलेस्टेरॉल कमी करणारी औषधे, चेहऱ्यावरील मुरुमांची औषधे आणि मानसिक विकारांसाठी औषधे घेत असल्यास त्याची बाळावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

त्याचप्रमाणे वरील कोणत्याही स्पष्ट कारणाव्यतिरिक्त बाळाच्या हृदयात छिद्र पडू शकते.

**लक्षणे**

मुलं जसजशी मोठी होतात तसतशी त्यांची धापवाढ वाढत जाते. त्यामुळे हृदयावरील दाब वाढतो. त्यानंतर ही लक्षणे दिसू लागतात.

हृदयातील छिद्राच्या आकारावर लक्षणे अवलंबून असतात.

जर छिद्र लहान असेल तर, मूल जोरजोरात श्वास घेते, वारंवार खोकला आणि श्वासोच्छ्वासाचा त्रास होतो. श्वसनमार्गाचे संक्रमण किंवा न्यूमोनिया होण्याची शक्यता असते.

तो त्याच्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे जास्त धावूखेळू शकत नाही. थोडासा व्यायाम केल्याने किंवा पळल्याने अशी मुलं थकतात. त्यांना वारंवार अशक्तपणा जाणवतो.

अनियमित हृदयाचे ठोके, छिद्रांमधून रक्त वाहण्यामुळे हृदयात डबडब असा आवाज येतो. कधी कधी छातीचे स्नायू जोरजोरात धडधडू लागतात.

सतत ताप येतो

भूक लागत नाही.

जेवताना थकवा येतो, घाम येतो.

रडत असताना गुदमरणे.

शारीरिक वाढ न होणे, वयानुसार वजन वाढत नाही.

कामात किंवा अभ्यासात एकाग्रता नसते.

पाय, पोटऱ्या, पोट सुजणे.

छिद्र मोठे असल्यास, वरील समस्यांव्यतिरिक्त मुलाला उच्च रक्तदाबाचा त्रास होतो. फुफ्फुसांना पुरेसा रक्तपुरवठा होत नसल्यामुळे, ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे मुलाचे ओठ आणि जीभ निळी पडतात.

अशी लक्षणे दिसू लागताच, उशीर न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**उपचार**

छिद्र आहे की नाही किंवा ते किती मोठं आहे यासाठी छातीचा एक्स-रे, इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ईसीजी), इकोकार्डियोग्राम, कार्डियाक कॅथेटेरायझेशन इत्यादी चाचण्या केल्या जातात.

हृदयाच्या छिद्राचा आकार आणि स्थान यावर त्याचे उपचार अवलंबून असतात. लहान छिद्र काही महिन्यांत आपोआपच बंद होतात.

हृदयातील हे छिद्र लहान आहे की मोठे हे रुग्णाच्या वयावर अवलंबून असते.

यावर डॉ. तारिक सांगतात, एखाद्या प्रौढ व्यक्तीसाठी, चार ते पाच मिलिमीटरचे छिद्र खूपच लहान असते. परंतु लहान मुलांच्या दृष्टीने हे छिद्र खूप मोठे असते.

हृदयातील छिद्रांमुळे दूषित आणि शुद्ध रक्त एकमेकांत मिसळते. जर छिद्र लहान असेल तर रक्त कमी प्रमाणात मिसळलं जातं. जर छिद्र मोठं असेल तर रक्त मिसळण्याचं प्रमाणही जास्त असतं.

अशावेळी काही लहान छिद्रांच्या प्रकरणांमध्ये छिद्र बंद होईपर्यंत, फुफ्फुसातील अतिरिक्त रक्तदाब कमी करण्यासाठी औषधे दिली जातात.

मात्र, लहान मुलांमध्ये ही गुंतागुंत टाळण्यासाठी सुरुवातीलाच शस्त्रक्रिया आवश्यक असते. जर छिद्र रक्तवाहिनीच्या झडपेच्या अगदी जवळ असेल तर शस्त्रक्रियेशिवाय दुसरा पर्याय नाही.

शस्त्रक्रिया सामान्यतः बाळाच्या जन्मानंतर पहिल्या काही आठवड्यांत ते काही महिन्यांत केली जाते. शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी शस्त्रक्रिया करून घेणं उत्तम.

शल्यचिकित्सक छातीच्या भिंतीमध्ये एक उपकरण लावून शस्त्रक्रिया करतात.

शस्त्रक्रियेनंतर सहा महिन्यांच्या आत जखम भरून येते.

कार्डियाक कॅथेटेरायझेशनद्वारे देखील शस्त्रक्रिया केली जाते. यासाठी मुलाच्या पायातील रक्तवाहिनीमध्ये पातळ, लवचिक नळी (कॅथेटर) टाकून हृदयाकडे नेली जाते. या कॅथेटर जाळीसारखे उपकरण ठेवलेले असते. त्यानंतर हे उपकरण हृदयाच्या छिद्रात टाकले जाते आणि छिद्राभोवती पडद्यावर जाळी पसरवली जाते.

कालांतराने, शरीरात नवीन पेशी तयार होतात. किमान सहा महिन्यांत हे उपकरण शरीराचाच भाग बनते.

या प्रकारची शस्त्रक्रिया नॉन-इनवेसिव्ह असल्याने, कमी वेळ लागतो आणि मुलं लवकर बरी होतात.

मात्र, छिद्र खूप मोठे असेल किंवा छिद्र गुंतागुंतीच्या ठिकाणी असेल तर ओपन हार्ट सर्जरीशिवाय पर्याय नाही. बाळ दोन महिन्यांचे झाल्यानंतर ही शस्त्रक्रिया करता येते.

मुलाच्या हृदयात छिद्र आढळून आल्यास काय काळजी घ्याल?

मुलाच्या हृदयात छिद्र आढळून आल्यास त्याला नियमित औषध देण्याबरोबरच त्याची अधिक काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टर देतात.

खेळ, धावणे किंवा अंगमेहनतीचे काम टाळले पाहिजे.

जर छिद्र मोठे असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने लवकरात लवकर शस्त्रक्रिया करून घेणं चांगलं. त्यामुळे मूल पटकन सामान्य जीवन जगू शकते.

उपचारानंतर मुलांचं बारकाईने निरीक्षण करायला हवं. यासाठी डॉक्टरांकडे रुटीन चेकअप आवश्यक आहे. योग्य वेळी उपचार न केल्यास छिद्र आणखीन मोठं होऊ शकतं.

यामुळे एंडोकार्डिटिस, हृदयाच्या आतील पृष्ठभागावर रक्ताचा जीवाणूजन्य संसर्ग, हृदयाच्या झडपांचे नुकसान, एरिथमिया आणि किंवा हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
सोमवार ९ ऑक्टोबर २०२३


## तर टोलनाके जाळून टाकू, राज ठाकरे यांचा राज्य सरकारला इशारा

मुंबई : गेल्या ४ दिवसांपासून मनसे नेते अविनाश जाधव हे उपोषण सुरू आहे. ठाण्यातील पाच ठिकाणी झालेल्या टोलवाढीविरोधात अविनाश जाधव हे त्यांच्या सहकाऱ्यांसह उपोषणाला बसले आहेत. शनिवारी (ता. ०७ ऑक्टोबर) अविनाश जाधव यांची तब्येत खाल्यावल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल रविवारी आंदोलनस्थळी जाऊन त्यांची भेट घेतली. तसेच, त्यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आदेश देखील त्यांच्याकडून देण्यात आले होते. ज्यानंतर आज (ता. ०९ ऑक्टोबर) राज ठाकरे यांनी शिवतीर्थ येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती.

## डॉ. संतुजी लाड यांच्या १०७ व्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

लातूर : सत्यशोधक समजाचे अग्रदूत, महात्मा ज्योतिबा फुले यांचे सहकारी तथा शिष्य हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १०७ व्या स्मृती दिनानिमीत्त गांधी मैदान लातूर येथील नियोजित पुतळा परिसरात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला आहे.

स्मृती दिना निमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमास डॉ. संतुजी रामजी लाड यांच्या पुतळ्याचे दिपाने, धुपाने पूजन करून, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. व्यंकट बेंद्रे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधिर खिरडकर, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंग घोणे, ज्येष्ठ समाजसेवक विश्वनाथ इंगळे, ओमप्रकाश आर्य, शिवसेना माजीउपजिल्हाप्रमुख शंकर रांजनकर, बलभिम कोथीबिरे,माजी सभापती ॲड. हमिद बागवान, डॉ. रावसाहेब थोरात,डॉ संतुजी लाड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे, गोरक्षक श्रीकांत राजनकर, महेन्द्र गायकवाड,ए टी एम अध्यक्ष ताहेरभाई सौदागर, दिगंबर कांबळे आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

# डोकं खाली वर पाय करत वृक्ष तोडीचा निषेध

### ग्रीन लातूर वृक्ष टीम

लातूर : लातूर जिल्ह्याचे वनक्षेत्र महाराष्ट्रामध्ये सर्वात कमी आहे. सदैव दुष्काळी परिस्थिती आणि यावर्षी अत्यल्प पावसामुळे पिण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होणार आहे. जिल्ह्यामध्ये जोपर्यंत कालबद्ध कार्यक्रम घेऊन झाडांची नियोजनबद्ध पद्धतीने वृक्ष लागवड वृक्ष जोपासना करून झाडांची संख्या वाढणार नाही तोपर्यंत लातूर जिल्ह्यावर सदैव असणारे दुष्काळी परिस्थितीच सावट नष्ट होणार नाही.

एक टक्क्यांपेक्षाही कमी वनक्षेत्र असतानाही लातूर जिल्ह्यामध्ये कुठे ना कुठे विनापरवानगी, अनावश्यक पद्धतीने वृक्षतोड होत आहे असं दिसून येत असते. आणि या वृक्षतोडीवर कुणाचेही कुठल्याही पद्धतीने नियंत्रण नाही असेही लक्षात आलेले आहे.

मागील सात-आठ महिन्यापासून वृक्षतोडीवर कुठेही कारवाई झालेली ऐकण्यात आलेली नाही.

गणपतीच्या मंडपाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज चौक, औसा रस्ता, छत्रपती शाहू महाराज चौक, दयानंद गेट परिसरात इत्यादी ठिकाणी मोठमोठी झाडे, कष्टाने वाढवलेली झाड ट्री गार्ड सहित तोडून आणि उपटून काढण्यात आली. महानगरपालिका प्रशासनाला याची पूर्व सूचना देऊनही त्यांनी यावरती कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही. या उपरांत गंभीर परिस्थिती म्हणजे गणपतीच्या मिरवणुकीच्या निमित्ताने औसा रस्त्यावरती गणपतीची मिरवणूक पाठीमागे आणि महानगरपालिका ची यंत्रणा झाडांची छटाई करत पुढे पुढे असं विचित्र विसंगत चित्र दिसून आलं.

कोणतीही जयंती, उत्सव आल्या मिरवणुका निघाल्या की पहिल्यांदा महानगरपालिका झाडांची छाटणी किंवा झाडांची कटाई चालू करते.

मागील दोन, तीन, चार वर्षांमध्ये महानगरपालिकेने लातूर शहरांमध्ये कुठेही स्वतः पुढाकार घेऊन वृक्ष लागवड किंवा वृक्ष संगोपनाचे कार्यक्रम घेतलाय किंवा कोणता उपक्रम घेतला आहे असं आढळून आलेले नाही.

मागील पाच-सहा वर्षांपासून लातूर जिल्ह्यामध्ये आक्रमक पद्धतीने वृक्ष लागवड वृक्ष संगोपन करणाऱ्या ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांना आज औसा रस्ता परिसरात गणपती मंडपच्या निमित्ताने पूर्णपणे वाढलेले एक झाड बुडातून तोडून टाकण्यात आलेलं निदर्शनास आलं.



याची दखल घेऊन ग्रीन लातूर वृक्ष टीम सदस्यांनी
खाली डोकं वर पाय
असं आंदोलन करून या वृक्षतोडीचा निषेध केलेला आहे. महानगरपालिका उद्यान विभाग, वृक्ष विभागाने या प्रकारची दखल घ्यावी, शहरांमध्ये आहे ती झाड टिकून ठेवावी , वृक्षतोडी पूर्णपणे आळा घालावा असे विनंती ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने करण्यात आली आहे.

# चेरा येथील दिवंगत जवान शेख शादुल निजामसाहेब यांच्या कुटुंबियांचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्याकडून सांत्वन

## दिवंगत जवानाच्या परिवाराला शासनास्तरावरून योग्य ती मदत देणार

लातूर : राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी चेरा ता. जळकोट येथील दिवंगत जवान शेख शादूल निजामसाहेब यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. शासन स्तरावरून जी मदत शक्य असेल ते आपण करू, तसेच दिवंगत जवानयांची एक लहान मुलगी आणि मुलगा यांच्या पुढील शिक्षणाच्या बाबतीतही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष कल्याणकर, तालुका स्तरावरील सर्व शासकीय यंत्रणा अधिकारी, सरपंच, पदाधिकारी,तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

जवान शेख शादूल निजामसाब यांच्या मागे आई, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा आहे. त्यांना उदरनिर्वाहसाठी कोणतेही साधन नाही, त्यामुळे त्यांना शासनाच्या कोणकोणत्या योजना देता येतील त्याच्या कागदपत्राची पूर्तता करून त्या योजना द्याव्यात अशा सूचना मंत्री संजय बनसोडे यांनी तहसीलदार यांना यावेळी दिल्या.



जवान शेख शादूल निजामसाब जळकोट तालुक्यातील चेरा येथील 'बोर्डर रोड ऑरगनायझेशन' (निमलष्करी बल) मध्ये जानेवारी २०१० पासून कार्यरत होते.

आज पर्यंत त्यांच्या लेह, लदाक, कारगिल, तेजू येथे पोस्टिंग होत्या. सध्या ते तेजपूर येथे कार्यरत होते. तेथे कार्यरत असतानाच त्यांना काविळ झाला. कावीळवर तेजपूर (आसाम) येथील मिलटरी हॉस्पिटल मध्ये उपचार सुरु असतानाच ३० सप्टेंबर २०२३ रोजी त्यांचे निधन झाले होते. ३ ऑक्टोबर २०२३ रोजी चेरा येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अत्यंसंस्कार झाले होते.

# रेणापूर तालुका भाजपा नूतन पदाधिकाऱ्यांना आ. कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

लातूर : भारतीय जनता पार्टीच्या रेणापूर तालुका नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपानेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे लातूर येथील भाजपा संवाद कार्यालयात वाटप करण्यात आले. येणारा काळ निवडणुकीचा असून नवनिर्वाचित भाजपा पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांनी पक्षाचे कार्य जिद्दीने आणि जबाबदारीने करुन पक्ष संघटन मजबूत करावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी यावेळी केले.

रेणापूर तालुका भाजपा अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे यांनी तालुका कार्यकारिणी जाहीर केली असून १७ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १५ चिटणीस, १३ निमंत्रीत सदस्य आणि ४२ कार्यकारिणी सदस्यांचा कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शनिवार ७ आक्टोबर रोजी भाजपनेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे लातूर येथील भाजपा संवाद कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, डॉ. बाबासाहेब घुले, यांची व्यासपिठावर उपस्थिती होती.

रेणापूर तालुका हा लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वातील भाजपाचा बालेकिल्ला आहे. पक्ष संघटन मजबूत असून येणाऱ्या प्रत्येक निवडणूकीत पक्षाचे मताधिक्य वाढविण्यासाठी प्रत्येकांनी कार्यरत राहावे असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की भारतीय जनता पार्टीच्या आणि पक्ष नेतृत्वाच्या माध्यमातून तालुक्यातील गावागावात, वाडीवस्तीत विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेचा अनेकांना लाभ मिळालेला आहे. तेंव्हा याबाबत कार्यकर्त्यांनी चर्चा घडवून आणावी पक्षाचे काम वाढवावे मिळालेले पद हे मोठी जबाबदारी आहे असे बोलून दाखविले. प्रारंभी तालुकाध्यक्ष ॲड, दशरथ सरवदे यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

रेणापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्या विविध आघाडी आणि मोर्चा नूतन पदाधिकारी युवा मोर्चा अध्यक्ष अमर चव्हाण, उपाध्यक्ष पंकज काळे, चंद्रकांत माने, महिला आघाडी अध्यक्षा अनुसया फड, किसान मोर्चा अध्यक्ष जयप्रकाश जटाळ, उपाध्यक्ष पृथ्वीराज उरगुंडे, दलित आघाडी अध्यक्ष सुभाष पवार, ओबीसी आघाडी अध्यक्ष विठ्ठल कसपटे, अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्ष जलील शेख, सहकार आघाडी अध्यक्ष डॉ. महेंद्र पिंपळे, व्यापारी आघाडी अध्यक्ष नितीन अढळकर, जेष्ठ कार्यकर्ता सेल संयोजक भाऊराव घुगे, रेणापूर शहर भाजपा अध्यक्ष अच्युत कातळे, रेणापूर शहर भाजयुमो अध्यक्ष संतोष राठोड, खरोळा शहर अध्यक्ष हणमंत राऊतराव.

रेणापूर तालुका भाजपा उपाध्यक्ष नामदेव बोंबडे, गोपाळ शेंडगे, राजू हाके, सिकंदर शेख, उत्तम चव्हाण, किशन क्षिरसागर, मच्छिंद्र चक्रे, राजकुमार आलापुरे, भागवत गित्ते, दत्तात्रय जोगदंड, सुनिल चेवले, इब्राहीम सय्यद, लक्ष्मण खलंग्रे, शिला आचार्य, अनिता राऊतराव, छाया जोगदंड, उमा सुर्यवंशी, सरचिटणीस सुकेश भंडारे, माधव घुले, श्रीकृष्ण पवार, राजकुमार मानमोडे, भाऊसाहेब गुळभिले, संतोष चव्हाण, चिटणीस ॲड. रमेश खाटप, शिवमुता उरगुंडे, सुनिल सुर्यवंशी, राहूल माने, बळवंत कराड, तुकाराम केंचे, संजय डोंगरे, बालाजी खरोळे, सचिन हालकुडे, दत्ता सरवदे, रमेश कटके, भिमराव मुंडे, महानंदा दरेकर, बायनाबाई साळवे, संगिता सातपुते, कोषाध्यक्ष सतिष कुलकर्णी, कार्यालय प्रमुख गणेश तुरूप.

रेणापूर तालुका भाजपा कार्यकारिणीत निमंत्रीत सदस्य श्रीकृष्ण जाधव, रमाकांत फुलारी, सुरेश बुड्डे, ज्ञानोबा भिसे, अनंत चव्हाण, ओमकारअप्पा क्षिरसागर, विजय गंभिरे, सुरेंद्र गोडभरले, विजय चव्हाण, दिनकर राठोड, अभिषेक आकनगिरे, वाजीद पठाण, प्रकाश रेड्डी, कार्यकार्यकारिणी सदस्य श्रीमंत नागरगोजे, शिवाजी उपाडे, शिवाजी जाधव, रघुनाथ पुंडकरे, शिवाजी सोमवंशी, नवनाथ रांजणे, बालाजी केंद्रे. नारायण राठोड, प्रकाश जाधव, बाजीराव साखरे, भालचंद्र सुर्यवंशी, अविनाश बोराडे, गोविंदराव देशमुख, सुंदर घुले, विलास केदार, पाटलोबा मुंडे, मारूती गालफाडे, अंबादास राठोड, अनिल येलगटे, बाबुराव कस्तुरे, संध्या श्रीकृष्ण पवार, अमृता मंगेश पाटील, राधा अभिमान लहाडे, रेशमा नामदेव भंडारे, सुमन ज्ञानोबा फड, उज्वला संतोष स्वामी, लक्ष्मीबाई बोळंगे, कल्पना राम मस्के, रंजना मारूती गालफाडे, ज्योती पंडीत लांबुटे, संजिवनी सुभाष नवगिरे, सविता संतोष घुगे, सुमन श्रीकृष्ण मोटेगावकर, मनिषा माधव बोराडे, दत्ता मुंडे, शालीकराव गोडभरले, बालासाहेब बरीदे, संपत कराड, राज जाधव, सुभाष रायनुळे, सुनिल बुड्डे आदींचा समावेश आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रमात रेणापूर तालुक्यातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी वाजीद सय्यद यांनी आपल्या सहकार्यासह आ. रमेशअप्पा कराड यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.




# वाले इंग्लिश स्कुलमध्ये योग शिबीर संपन्न

लातूर : वाले इंग्लिश स्कुलमध्ये योग शिबीर संपन्न झाले. हे शिबीर अणुव्रत समिती लातूर यांच्या वतीने घेण्यात आले. या शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना योगाचे महत्व सांगण्यात आले. तसे या संस्थेतर्फे योग देखील विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. दीपक गटागट यांनी या योग शिबीराचे महत्व विषद केले. त्या कार्यक्रम अणुव्रत समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्वांनी मेहनत घेतली.

सदरील शिबीरास संस्थेचे सचिव मकरंद सावे यांनी भेट दिली.

यावेळी शिबीरास प्राचार्य चंद्रशेखर भोगडे, पर्यवेक्षक ममता सावे, भारती धाराशिवकर, राजेश बाकलीकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी यांच्या सकारात्मक भूमिकेमुळेच शासकीय ग्रंथालयाला जागा मिळाली-संजय मस्के

लातूर : लातूर जिल्हा शासकीय ग्रंथालयातून दरवर्षी आयएएस आणि आयपीएस घडविण्याचे काम आगामी काळात केले जाणार नाही, जिल्हा शासकीय ग्रंथालयासाठी त्यासाठी प्रशस्त जागेची आवश्यकता होती,याबाबत आपण जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी अवगत केल्याने त्यांनी अतिशय सकारात्मक भूमिका घेवून जागा मंजूर केली असे सांगून या नियोजित जागेवर तीन मजली विविध दालनांनी सुसज्ज अशी डिजीटल ग्रंथालय ईमारत उभारण्यात येणार असल्याचे केल्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी सांगितले.

जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि ग्रंथपालन वर्गाच्या संयुक्त विद्यमाने,शनिवार,दि.७ ऑक्टोबर रोजी हुतात्मा स्मारक येथे जिल्हा शासकीय ग्रंथालयास संजय मस्के यांनी अल्पवधीत कौशल्याने जागा मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रंथपालन प्रमाणपत्र उत्तीर्ण संगम भालेराव,वैष्णवी मोरे,प्रशांत पोस्ते,योगेश भंडारी या गुणवंत विद्यार्थ्यांना संजय मस्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.यावेळी सत्काराल उत्तर देताना ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष युवराज जाधव हे होते.मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले,जिल्हा ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे,संघाचे सदस्य एल.बी.आवाळे,ग्रंथपालन वर्ग शिक्षक प्रशांत अंधोरीकर आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरवातीला ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन् आणि स्मृतीशेष ॲड.त्र्यंबकदास झंवर यांच्या प्रतिमा पूजन व अभिवादन झाल्यानंतर जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांचा शाल,फेटा,ग्रंथ भेट देवून सत्कार करण्यात आला.सर्व तालुक्याच्यावतीनेही संजय मस्के यांचा शाल व पुष्पहाराने गौरव करण्यात आला.

पुढे बोलताना जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के म्हणाले,कोणाला महापुरुषांपासून, कोणाला ग्रंथ वाचून व अन्य मार्गाने दखलपात्र काम करण्याची प्रेरणा मिळते,आपला एका व्यक्तीने अपमान केल्याची खुणगाठ बांधून,ग्रंथालय क्षेत्रात कामाला आरंभ केला.या कामात अनेक अडचणी आल्या पण संबंधित मंत्री आणि अधिकार्यांना ग्रंथालयाचे महत्व पटवून देवून,राज्यातील सहा जिल्ह्यात शासकीय ग्रंथालयाच्या डिजीटल इमारती उभारल्या.लातूरलाही जागा मिळवताना केलेल्या कामाची माहिती देवून इथे तीन मजली इमारत उभारण्यात येईल,असे सांगून लातूरची ग्रंथालय चळवळ राज्यात विशेष स्थानी आहे असेही ते म्हणाले.

जिल्हा ग्रंथालयासाठी जागा मिळावी अशी ग्रंथमित्र ॲड.त्र्यंबकदास झंवर यांची अपेक्षा होती, ती आता पूर्ण होत असल्याचे सांगून,ातूरची जिल्हा शासकीय ग्रंथालय इमारत विशेष अशी उभारली जावी,ग्रंथालय संघ आपल्या सोबत असल्याचे ग्रंथमित्र राम मेकले यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य एल.बी.आवाळे, ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे,प्रशांत अंधोरीकर, ग्रंथमित्र संजय सूर्यवंशी, अनिल पाटील यांनीही संजय मस्के यांनी जिल्हा ग्रंथालयाला जागा मिळवण्यासाठी अल्पावधीत केलेल्या कौशल्यपूर्ण कामगिरीबद्दल कौतुक करुन,लातूरला जिल्हा शासकीय ग्रंथालयाची राज्यात आगळीवेगळी इमारत उभी करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर कापसे व सूत्रसंचालन यांनी केले.सदस्य राम मोतीपवळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संतोष करमले,कुमार भालेराव,सुशील मेकले,नागनाथ बिरादार, गुप्तलिंग स्वामी, काशिनाथ बोडके,अशोक खोडवे,विठ्ठल कटके,गिरीधर जंगाले,शिवाजी मुंढे, सूर्यकांत जगताप,संतोष शहरकर आदिंनी सहकार्य केले.या कार्यक्रमाला जिल्ह्यातील ग्रंथालय कार्यकर्ते, ग्रंथपाल,संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **ASIF GAFOORSAB SHAIKH TO : ASIF GAFUR SHAIKH** HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ASIF GAFUR SHAIKH** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME : -ASIF GAFOORSAB SHAIKH**
**NEW NAME : -ASIF GAFUR SHAIKH**
**ADDRESS :- HANGEWADI ROAD KINGAON, TQ. AHMEDPUR, DIST- LATUR**

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **SAYED ASFAR YOUSUF TO : ASFAR YOUSUF SAYYED** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **ASFAR YOUSUF SAYYED** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE

**OLD NAME : SAYED ASFAR YOUSUF**
**NEW NAME : ASFAR YOUSUF SAYYED**
**ADDRESS : SUBHASH CHOWK, BHUSAR LINE, LATUR**

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते